**MHRG040000202026**

**दिवाणी किरकोळ अर्ज नं. ६७/२०२६**

**प्रविण इंदल चव्हाण**

**विरूध्द**

**इंदू इंदल चव्हाण**

## पाचवे सह. दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर, पनवेल, यांचे न्यायालयात

(पिठासीन अधिकारीः आर.वाय.खंडारे यांचे समक्ष)

## निशाणी ०१ खालील आदेश

**०१.** अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज १८२७ च्या बॉम्बे रेग्युलेशन क्र. VIII अन्वये वारस दाखला मिळणेकरिता दाखल केला आहे.

**०२.** अर्जदार हा **मयत इंदल बल्लू चव्हाण** यांचा मुलगा असुन सामनेवाली हया मयताच्या पत्नी आहेत. मयत इंदल बल्लू चव्हाण हे दिनांक २९/०६/२०१५ रोजी यवतमाळ येथे मयत झाले आहेत. मयत इंदल बल्लू चव्हाण यांची आई हया ब-याच वर्षापूर्वी मयत झालेल्या आहेत. मयत इंदल बल्लू चव्हाण यांना अर्जदार व सामनेवाली यांच्या व्यतिरिक्त दुसरे कोणीही वारस नाही. मयत इंदल बल्लू चव्हाण यांच्या नावावर अर्जाच्या परिच्छेद क्र. ३ मध्ये नमुद असलेली मालमत्ता आहे व मयत इंदल बल्लू चव्हाण यांच्या मृत्यूनंतर सदर मालमत्तेतील त्यांच्या हिश्श्याला अर्जदाराचे नाव वारस म्हणुन लावण्यासाठी वारस दाखला मिळावा म्हणून अर्जदार यांनी सदरचा अर्ज दाखल केला आहे.

**०३.** सामनेवाली प्रकरणात हजर झाली व त्यांनी **नि. १२** वर अर्जदाराने मागणी केल्याप्रमाणे वारस दाखला देण्यास हरकत नाही असे म्हणणे दाखल केले आहे.

**०४.** अर्जदारांनी **नि.क्र.** ८ प्रमाणे दि. ३०/०१/२०२६ रोजी जाहिरनामा व दि. ०३/०२/२०२६ रोजी 'रायगड नगरी' या पेपरमध्ये जाहिर नोटीस दिल्यानंतर ३० दिवसांत कोणीही सदरच्या अर्जास हरकत घेतलेली नाही.

**०५.** वरील कथनास पुष्टी देण्याकरिता अर्जदाराने स्वत:चे पुराव्याचे शपथपत्र **नि. १७** वर दाखल केले आहे व त्यात त्यांच्या वडिलांच्या मृत्यूच्या दाखल्याची

पडताळलेली प्रत **नि.१८** वर दाखल केली आहे. तसेच त्यांच्या वडीलांच्या नावावर असलेल्या मालमत्तेच्या नोदणीकृत खरेदीखत क्र.१७४२/२०१२ ची पडताळलेली प्रत **नि.१९** वर दाखल केली आहे. तसेच त्यांनी त्यांच्या आईच्या नावाचे रेशनकार्डची पडताळलेली प्रत **नि.२०** वर दाखल केली आहे. **आर्टिकल 'अ'** वर वृत्तपत्रात जाहिर करण्यात आलेली नोटीस दाखल करण्यात आलेली आहे. या व्यतिरिक्त **नि.०८** वर जाहिरनाम्याची बजावणी करण्यात आलेली आहे. अर्जदाराने **नि.क्र. २२** वर पुरावा बंद पुरसिस दाखल केली आहे. सामनेवाला यांनी **नि. २३** वर पुरावा बंद पुरशीस दाखल केली आहे.

**०७.** अर्जदाराने साक्षीमध्ये सांगितलेल्या कथनास कागदपत्र दुजोरा देतात. **नि.क्र. १९** वरील खरेदीखतानुसार सदर प्रकरणातील मालमत्ता मयत इंदल बल्लू चव्हाण यांच्या मालकिची असल्याचे दिसुन येत आहे. अर्जदार व सामनेवाली यांच्या व्यतिरिक्त मयत इंदल बल्लू चव्हाण यांना इतर कोणीही वारस नाही. अर्जदाराने सदर अर्ज वारस दाखला त्यांच्या नावाने देण्यात यावा असा दाखल केला आहे व त्यास सामनेवाली यांनी हरकत नाही असे सांगितले आहे परंतु पुरावा दाखल केल्यानंतर अर्जदार यांनी नि. २१ वर वारस दाखला अर्जदार व सामनेवाली दोघांच्या नावाने देण्यात यावा असे पुरशीस दाखल केलेली आहे. अर्जदार व सामनेवाली यांच्या व्यतिरिक्त मयत इंदल बल्लू चव्हाण यांना कोणीही वारस नसल्याबाबतचा अर्जदाराचा पुरावा विना आव्हानित असल्यामुळे त्यास शंका घेण्याचे कोणतेही कारण दिसून येत नाही. वरील विवेचनावरून अर्जदार व सामनेवाली हे मयताचे वारस असल्याचे समाधान झाल्यावरून अर्जदार व सामनेवाली हे वारसाचा दाखला मिळविण्यास पात्र असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश पारित करित आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| १ | अर्ज मंजूर करण्यात येत आहे. |
| २ | अर्जदार **प्रविण इंदल चव्हाण** व सामनेवाली **इंदू इंदल चव्हाण** हे **मयत इंदल बल्लू चव्हाण** यांचे परिच्छेद क्र.३ मध्ये नमुद मिळकतीमध्ये त्यांच्या |

| | |
|---|---|
| | हिश्शाचे वारस असल्याचे वारस प्रमाणपत्र मिळकतीच्या मुल्यांकनावर योग्य ती कायदेशीर कोर्ट फी आकारून अर्जदार यांना देण्यात यावे. |
| ३ | सदरचे प्रमाणपत्र हे वारस प्रमाणपत्र (Heirship Certificate) असून ते उत्तराधिकारी प्रमाणपत्र (Succession Certificate) नाही. |
| ४ | नाझर यांनी कायद्याप्रमाणे आवश्यक असलेली कोर्ट फीचा तपशिल द्यावा. |
| ५ | सदर प्रमाणपत्र दिवाणी नियमावली प्रकरण १४ परिच्छेद ३१२ मधील टिपणीस अधीन राहून देण्यात येत आहे. अर्जदार यांनी प्रमाणपत्र प्राप्ती पासून वरील टिपणीस अनुसरून पुढील पूर्तता करावी. |

RAJESH YASHWANTRAO KHANDARE

Digitally signed by RAJESH YASHWANTRAO KHANDARE
Date: 2026.03.30 17:34:55 +0530

**दि. ३०/०३/२०२६** **(आर.वाय.खंडारे)**

**पनवेल.** **पाचवे सह दिवाणी न्यायाधिश, व. स्तर पनवेल.**